*ब्रम्हपूरी, नागभीड, सिंदेवाही या तालुक्यातील पुरग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी त्वरीत पंचनामे करण्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रशासनाला निर्देश*
================================================================

अतिवृष्टीमुळे चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, नागभीड, सिंदेवाही या तालुक्यातील नागरिकांना मोठया प्रमाणावर पुरपरिस्थीतीचा फटका बसला असून मोठया प्रमाणावर घरांची पडझड झाली आहे व शेतीचे सुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. तातडीने घरांच्या व शेतीच्या झालेल्या नुकसानाचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिले आहे.

सलग 2 दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे ब्रम्हपूरी, नागभीड, सिंदेवाही या तालुक्यात पुरसदृष्य परिस्थीती निर्माण झाली आहे. काही प्रमुख मार्ग सुध्दा बंद झालेले आहेत. नागरिकांना मोठया प्रमाणावर नुकसानाचा सामना करावा लागला आहे. त्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने त्वरीत पंचनामे करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहे.